महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज, जि.सांगली.

Government Medical College, Miraj Dist-Sangli

Pandharpur Road, Miraj-416410 (M.S.)

Tel:0233/2232090-99 Fax:2231959 E-mail:-deangmcmiraj@yahoo.co.in


जा.क्र./शावैममि/व्ही.आर.डी.एल/कंत्राटीपदे/जाहिरात/ ९३६२६-२८/२०२२ दिनांक:२४/१२/२०२२

## जाहिरात

विषय:- **व्ही.आर.डी.एल (VRDL) लॅबसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कंत्राटी पध्दतीने करारतत्वावर रिसर्च सायंटिस्ट १ (मेडिकल) व प्रयोगशाळा तंत्रज्ञ (१२० दिवसांकरीता) पदे भरणेबाबत...**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज अंतर्गत व्ही. आर. डी. एल. (Virus Research & Diagnostic Laboratory) या प्रयोगशाळेकरिता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर (१२० दिवसांकरीता) खाली दिलेल्या तक्त्यानुसार पदे नेमणूक करावयाची असून यासाठी इच्छूक उमेदवारांनी अर्ज करावेत. **अर्जाचा नमुना, अटी व शर्ती** या संस्थेच्या संकेस्थळावर www.gmcmiraj.edu.in उपलब्ध करण्यात आलेला आहे. अर्ज स्वहस्ते खाली नमुद केलेल्या ठिकाणी विहित कालावधीत सादर करावा. ई- मेल, पोस्टाने, कुरियरने पाठवलेले व अपुर्ण अर्ज इत्यादी स्विकारले जाणार नाहीत. अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्रे दोन (२) छायांकित प्रतींमध्ये जोडावीत, तसेच मुलाखतीच्यावेळी अर्जासोबत जोडलेल्या सर्व छायांकीत प्रतींची मुळ कागदपत्रे सादर करावीत. तसेच या पदांकरीता अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथे मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे. भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे,

| अ. क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | एकत्रित वेतन प्रतिमाह | वय |
|---|---|---|---|---|---|
| १ | रिसर्च सायंटिस्ट-१/ सायंटिस्ट - बी (मेडिकल) | ०१ | मान्यताप्राप्त विद्यापीठातून एम.डी. मायक्रोबायॉलॉजी **अथवा** मान्यताप्राप्त विद्यापीठातून एम.बी.बी.एस. आणि तीन वर्ष मायक्रोबायॉलॉजी/ व्हायरॉलॉजी अनुभवासह | रु. ५६,०००/- + HRA | कमाल ३५ वर्षे |
| २ | Project Technician-III (Lab Technician) For NIV-VHF PROJECT | ०१ | मान्यताप्राप्त विद्यापीठातून बी.एस्सी, डी.एम.एल.टी. प्रमाणपत्र किंवा बी.पी.एम.टी (लॅब टक्निशीयन) प्रमाणपत्र व संगणक प्रमाणपत्र आवश्यक (MS-CIT) | रु. १८,०००/- | कमाल ३० वर्षे |
| * इ.मा.व./इ.डब्यु.एस. व एस.सी./एस.टी. उमेदवारांना अनुक्रमे ०३ व ०५ वर्षे वयामध्ये सवलत. | | | | | |

**अर्ज स्विकारण्याचा कालावधी** : दिनांक २६/१२/२०२२ ते ०५/०१/२०२३

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण**: सुक्ष्मजीवशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज (कार्यालयीन वेळेत)

**मुलाखतीचे ठिकाण**: अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज.

**पात्र उमेदवारांची यादी**:- दि. १२/०१/२०२३ रोजी सुक्ष्मजीवशास्त्र विभाग, शा.वै.म, मिरज कार्यालयीन सुचना फलकावर व संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(मुलाखतीस पात्र उमेदवारांचा मुलाखतीचा/लेखी परिक्षेचा दिनांक व वेळ या यादीत नमुद करण्यात येईल.)

**अटी व शर्ती:**

१) सदरची नियुक्ती हि पुर्णपणे कंत्राटी तत्वावर असलेने आपणाला एकत्रित मिळणारे मानधन या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या महागाई भत्ता, घरभाडे भत्ता वा इतर कोणत्याही नियमीत शासकीय कर्मचारी यांना मिळणाऱ्या सोई सुविधांचा लाभ मिळणार नाहीत.



पुढील पानावर...

२) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे अटी व नियमानुसार नियमित व कायमस्वरुपी पदांना अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही प्रकारच्या रजा व सवलती आपल्याला लागु असणार नाहीत. सदर पदाकरीता बदली रजा वगळता इतर कोणतीही मध्यम अथवा दिर्घ रजा उपलब्ध असणार नाही. हाच नियम प्रसुती रजा, बालसंगोपन रजा, गर्भपात रजा आणि कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया याकरीता लागू राहील. जर काही कारणास्तव रजा घ्यावी लागल्यास सेवा आपोआप समाप्त होईल व सदर पदाची पुनःश्च जाहिरात केल्यानंतर पुर्ननियुक्ती करीता पात्र राहणार नाही.

३) नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाब अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील.

४) करार पद्धतीवरील नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

५) करार पद्धतीवर नियुक्त केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभागप्रमुख व अधिष्ठाता हे नियमितपणे घेतील. आढावा असमाधानकारक असल्यास संबंधित उमेदवाराची नियुक्ती कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राहतील. तसेच प्रोजेक्ट बंद झाल्यास उमेदवारीची नियुक्ती समाप्त होईल.

६) करार पद्धतीच्या उमेदवारास विभागाचे प्रमुख व अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली आपले कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित पूर्ण वेळ काम करणे बंधनकारक राहील. सदर पदे ही साथरोग नियंत्रण प्रकल्पांतर्गत असल्याने परिसरात उद्भवणा-या साथरोगांच्या उद्रेकांच्या वेळी प्रसंगानुरुप उद्रेकाच्या ठिकाणी जाऊन कामकाज करावे लागेल.

७) करार पद्धतीतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही.

८) करार पद्धती वरील निवड झालेल्या उमेदवारांनी कामावर रुजू होण्यापूर्वी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याची लेखी हमी रु.१०० च्या स्टॅप पेपरवर प्रतिज्ञापत्र / करारपत्र नोटरी करुन कामावर रुजू होताना सादर करणे आवश्यक आहे.

९) नियम व अटींच्या अधीन राहून नियुक्ती आदेश देण्यात येतील. उच्च शैक्षणिक धारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

१०) उमेदवारास संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. एमएस- सीआयटी किंवा तत्सम संगणक परिक्षा उर्तीर्ण प्रमाणपत्र आवश्यक आहे.

११) मुलाखतीसाठी प्राप्त झालेल्या अर्जाच्या छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची संख्या जर मोठया प्रमाणात असेल तर पात्र उमेदवारांची आवश्यकतेप्रमाणे लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच मुलाखत घेण्यात येईल.

१२) निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील यासाठी कोणतेही निवेदन/तक्रार विचारात घेतले जाणार नाही.

१३) कोणतीही पूर्वसूचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलणेचे किंवा रद्द करणेचे अधिकार निवड समितीने राखून ठेवले आहेत.

GOVT. MEDICAL COLLEGE MIRAJ

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

१) मा. आयुक्त, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना.
२) मा. संचालक, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना.

GOVT. MEDICAL COLLEGE
MIRAJ

# अर्जाचा नमुना

पासपोर्ट आकाराचा एक फोटो चिकटवून त्यावर उमेदवाराने स्वाक्षरी करावी व एक फोटो सोबत आणावा.

प्रति,
मा. अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
मिरज.

**पदाचे नाव** :................................................

१. अर्जदाराचे नाव : ..........................................................................

२. अर्जदाराचे नावात बदल असल्यास : ..........................................................................

३. जन्मदिनांक : ..........................................................................

४. जात : ..........................................................................

५. पत्रव्यवहाराचा पत्ताः ..........................................................................

६. कायमस्वरुपी पत्ताः ..........................................................................

७. ई-मेल आयडी : ..........................................................................

८. दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्र.: ..........................................................................

९. संगणकाचे ज्ञान (एमएस-सीआयटी किंवा तत्सम संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र)
आहे नाही

१०. शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | संस्था/ विद्यापीठाचे नाव | टक्केवारी | श्रेणी | प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |



पुढील पानावर...

११. अनुभवाचा तपशील:

| अ.क्र. | कामकाजाच्या ठिकाणाचे नाव | पदनाम | कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१२. अतिरिक्त शैक्षणिक अर्हता:

ठिकाण:

दिनांक: उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी

सहपत्रे:

१) शैक्षणिक अर्हताचे प्रमाणपत्रे (गुणपत्रिका, पदवी व पदव्युत्तर प्रमाणपत्रे, एमएमसी रजिस्ट्रेशन)
२) जन्मतारखेचा दाखला अथवा एस.एस.सी. उत्तीर्ण प्रमाणपत्र
३) जात प्रमाणपत्र
४) एमएस- सीआयटी किंवा तत्सम संगणक परिक्षा उर्तीर्ण प्रमाणपत्र
५) नावात बदल असल्यास गॅझेट प्रमाणपत्र
६) अनुभवाचे प्रमाणपत्र
७) ओळखपत्रे (आधार कार्ड किंवा पॅनकार्ड इ.)